क्र./ रा.भू.अ.आ.का.४ /प्र.क्र १४/२०१४
प्रमाणीकरण आज्ञावली / १४
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख( महाराष्ट्र राज्य ),पुणे
यांचे कार्यालय ,पुणे.
दिनांक - ०६/१२/२०१४

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी

विषय :- तालुकास्तरीय ई-फेरफार पूर्व तयारी डाटा प्रमाणीकरण आज्ञावली सुधारीत.

**संदर्भ** :- १) या कार्यालयाकडील परिपत्रक क्रं.रा.भु.अ.आ.का-४/प्र.क्र.१४ / २०१४ दि.२४/६/२०१४
२) या कार्यालयाकडील परिपत्रक क्रं.रा.भु.अ.आ.का-४/ डेटा दुरुस्ती आज्ञावली/प्र.क्र.१७ /२०१४ दि.२४/७/२०१४

ई-फेरफार आज्ञावली अंमलबजावणीसाठी पूर्व तयारी कामे पुर्ण झाल्याचे तपासणीसाठी " तालुकास्तरीय ई-फेरफार पूर्व तयारी डाटा प्रमाणीकरण आज्ञावलीचा " वापर करणे व अंतीम डाटा सीडी पाठविणेबाबतची कार्यपध्दती संदर्भ क्रं.१ मध्ये नमूद दिनांक २४/६/२०१४ चे परिपत्रकान्वये देणेत आलेल्या आहेत. अंतीम तपासणी अहवाल प्रमाणपत्र विहीत करणेत आले आहे. तथापी दिनांक २०/५/२०१३ चे डाटा दुरुस्ती आज्ञावलीचे परिपत्रकानुसार अहवाल क्रमांक ६, ८ व ९ हे अनिवार्य नसलेचे कळविणेत आले आहे. त्याच बरोबर दिनांक २८/०६/२०१४ चे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, यांचे राज्यस्तरीय परिषदेमध्ये अहवाल क्र.१ व ३ हे निरंक करणेसाठी जास्त कालावधी लागत असलेने दोन अहवाल निरंक करणे तुर्त अनिवार्य न ठेवणेची विनंती करणेत आली होती. त्यानुसार डोमेन एक्सपर्ट ग्रूपची मिटींग घेऊन अहवाल क्रमांक १ व ३ निरंक करणेमध्ये सुधारीत मार्गदर्शक सुचना परिपत्रक क्रं.रा.भु.अ.आ.का-४/डेटा दुरुस्ती आज्ञावली/प्र.क्र.१७ /२०१४ दिनांक . २४/७/२०१४ चे परिपत्रकाव्दारे देणेत आल्या आहेत.

वरील प्रमाणे आज्ञावलीमध्ये सुधारणा करुन सुधारीत आज्ञावली पुरविणेत आली आहे. तालुकास्तरीय ई-फेरफार पूर्व तयारी डाटा प्रमाणीकरण आज्ञावलीमध्ये यापुर्वी परिशिष्ठ -१ अंतीम

तपासणी अहवाल प्रमाणपत्र विहीत करणेत आले होते. त्यामध्ये १) डाटा कनव्हर्जन २) डाटा क्लिनिंग ३) सेवार्थ आयडी, रजिस्ट्रेशन ४) डाटा करेक्शन ५) डाटा अपडेशन ६) पिक नोंदी अपडेशन ७) डीबीए टुलचा वापर ८) सर्व गावांच्या १०० % पीडीएफ तयार करणेत आल्या आहेत काय ? ९) सर्व गावांच्या प्रिंट पीडीएफ विहीत परीमानात तपासुन आवश्यक त्या दुरूस्त्या करणेत आल्या आहेत काय ? १०) तलाठी व मंडल अधिकारी यांचे साठी डिजीटल सिग्नेचर प्राप्त करणे .

हे अहवाल आज्ञावलीव्दारे आपोआप तयार होतात. तसेच या अहवालातील स्तंभ क्र.३ मधील सर्व उत्तरे होय/होकारार्थी असणे आवश्यक केले होते. परंतु अहवाल क्र. १ व ३ निरंक करणेसाठी सुधारीत सुचना संदर्भ क्र. २ चे परिपत्रकाव्दारे निर्गमित केलेने डाटा प्रमाणीकरण आज्ञावलीमध्ये अनुषंगीक बदल करणे आवश्यक होते त्याप्रमाणे डाटा सीडी सादर करताना सादर करावयाचे अहवालाचे प्रपत्र क्र. -१ व प्रपत्र क्र.-२ असे दोन भाग करणेत आले आहेत त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१) **प्रपत्र -१, ७/१२ चा डाटा स्टेट डेटा सेंटरवर (SDC ) स्थापीत करणेबाबत. :-**

आपल्या तालुक्यात अदयावत अज्ञावलीचा वापर करुनच प्रपत्र -१ व अनुषंगीक अहवाल काढावेत अद्यावत आज्ञावली ही आपल्याला राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या कडून जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी यांचे मार्फत प्राप्त करुन घेता येईल.

प्रपत्र-१ व त्या अनुषंगीक रिपोर्ट तयार करताना आज्ञावली मध्ये येणा-या अडचणी बाबत राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्याशी संपर्क साधून अडचणी सोडवून घ्याव्यात, त्यांनी दिलेल्या सूचना या लिहून सीडी सोबत सादर कराव्यात.

सदरचे प्रपत्र हे संबंधीत तालुक्याची पुर्वतयारीची कामे पुर्ण झालेनंतर दयावयाचे आहे.आपल्या तालुक्याचा डेटा हा दोन बॅकअप सीडी मध्ये दयावयाचा आहे. प्रपत्र-१, सर्व अहवाल, बॅकअप सीडी इत्यादींची तपासणी करुन प्रपत्र-१ मध्ये दर्शविलेल्या व्यक्तींच्या स्वाक्षरीनीशी ट्रायल रन साठी स्टेट डेटा सेटरवर अपलोड करणेसाठी कार्यासन अधिकारी तथा नोडल ऑफीसर, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडे डीबीए यांनी समक्ष सादर करावयाच्या आहेत.

**प्रपत्र -१ देण्यापुर्वी खालील गोष्टींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

१. या सुधारीत प्रपत्रामध्ये अहवाल क्र. ४ डाटा करेक्शन चे ४ अ व ४ ब असे दोन भाग करणेत आले आहेत. ४ अ मधील २,५,७ व १० ते १४ हे अहवाल निरंक करणे आवश्यक केले आहे. ४ ब या अहवालामधील १,३,६,८ व ९ हे अहवाल निरंक करणेमधून तुर्त सवलत देणेत आली आहे. अन्य तपशिल पुर्वी प्रमाणेच कायम ठेवणेत आला आहे.

२. प्रपत्र १ सादर करताना त्यातील अहवाल क्रं.१ ,२,३ व ७ होय असणे आवश्यक आहे.

३. तालुक्याची डाटा सीडी पाठविताना संबंधीत जिल्हयातील जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांचेशी संपर्क साधून अहवाल त्यांना दाखवुन नंतरच सीडी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख, (म.राज्य) पुणे या कार्यालयात डीबीए यांचे मार्फत पाठविण्यात यावी.

या कार्यालयात तहसिल कार्यालयाकडून ट्रायल रनसाठी प्राप्त होणारी सीडी अहवालामध्ये खालील प्रमाणे त्रुटी दिसुन येतात. त्यामुळे डाटा सीडी रिजेक्ट होते. तरी आपले अधिनस्त तहसिलदार यांना ट्रायल रनसाठी सादर करावयाच्या सीडी बाबत बॅकअप सीडीची प्रक्रिया जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी यांचेकडून समजून घेवूनच नविन सॉफ्टवेअरचा वापर करुन सॉफ्टवेअर मधुन तयार होणारे प्रपत्र-१ ,व अहवालाच्या प्रती सादर करणे बाबत सूचना देण्यात याव्यात.

१. अद्यावत नविन आज्ञावलीचा (सॉफ्टवेअर) वापर होत नाही असे दिसुन येते. .

२. सीडीतील डेटा वाचता येत नाही/ कॉपी होत नाही.

३. अहवालामध्ये प्रपत्र -१ चा समावेश नसतो.

४. प्रपत्र -१ हे सॉफ्टवेअर रन करुन न काढता टाईप करुन सादर केले.

५. युनिकोड रुपांतरण, गोलू निरंक करणे, सेवार्थ आयडी रजिस्ट्रेशन (DDE, DBA,मंडल अधिकारी, तलाठी) सर्व प्रलंबीत फेरफार संगणकावर अद्यावत करणे, डीबीए टुलचा वापर, पीडीएफ १०० % करणे इत्यादी अत्यावश्यक बाबी सुध्दा पुर्ण न करता सीडी पाठविण्यात येते.

तरी वरील बाबींची पुर्तता करुन सीडी सादर करताना प्रपत्र -१ वर जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, डिबीए , तहसिलदार, या सर्वांनी स्वाक्षरी करुनच सीडी व अहवाल पाठविण्यात यावेत.

२) **प्रपत्र-२, ७/१२ चा डाटा स्टेट डेटा सेटरवर अंतीमतः स्थापीत करणेबाबत. :-**

वर नमूद प्रमाणे प्राथमिक डाटा वरुन ई-फेरफार आज्ञावलीचा डाटा ट्रायल रन साठी अपलोड झालेवर तलाठी व दुय्यम निबंधक कार्यालयातील कर्मचारी यांनी सर्व प्रकारचे फेरफार होतात याची खात्री करावी. येणा-या अडचणी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र,पुणे व जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख (म.राज्य),पुणे यांचे मार्फत सोडवून घ्याव्यात व आज्ञावलीचा वापर यशस्वीरित्या झाल्यानंतर यासोबत सादर केलेल्या सुधारीत प्रपत्र-२ व सर्व अहवालांसह अंतीम डाटा सीडी वरील प्रमाणे कार्यासन अधिकारी तथा नोडल ऑफीसर, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे कार्यालय यांचे कडे सादर करावयाची आहे. या प्रपत्रावर डीबीए, तहसिलदार, डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट व जिल्हाधिकारी या सर्वांनी स्वाक्षरी करावयाची आहे.

अंतीम डाटा सीडी व अहवाल प्राप्त झाले नंतर ती स्टेट डेटा सेंटवर अपलोड करणेत येईल व ऑनलाईन फेरफार सुरू करणे व हस्तलिखित नोंदवहया बंद करणे बाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे कार्यालयामार्फत आदेश /सुचना निर्गमित होतील. अंतीम सीडी पाठविल्यानंतर आपल्या तालुक्यातील हस्तलिखीत ७/१२, गाव नमुना ८, फेरफार नोंदवही बंद करण्याची कार्यवाही करावी व हस्तलिखीत नोंदवहया सर्व तलाठयांकडुन तहसील कार्यालयात जमा करुन घ्याव्यात. ऑनलाईन फेरफार प्रक्रीया सुरु झाल्यानंतर सर्व प्रकारचे फेरफार हे ऑनलाईन आज्ञावलीव्दारे घेणेत यावे.

**सोबत :- सुधारीत प्रपत्र -१ व २ संलग्न**

**( चंद्रकांत दळवी )**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य.) पुणे**

प्रत : मा. प्रधान सचिव, (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : मा. सचिव ,माहीती तंत्रज्ञान, ,मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : श्री. राणे आर.आर., उपमहानिदेश, पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी .

प्रत: डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

२/- सदर परिपत्रकाची प्रत संबंधीत तहसिलदार यांना देणेत यावी.

प्रत: जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी (सर्व ) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : उपविभागीय अधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : तहसिलदार (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

# प्रपत्र- १

## प्रमाणपत्र

७/१२ चा डाटा स्टेट डेटा सेंटरवर स्थापीत करणेबाबत.

तालका :- जिल्हा :- दिनांक :- --/---/२०१४

एकूण गावे :- एकूण ७/१२ ची संख्या :- एकूण खाते :-

| अं.न. | ऑफलाईन कामाचा तपशिल | समरी अहवालाप्रमाणे काम पुर्ण आहे का ? (होय/नाही) | संबंधीत ऑफलाईन डाटा प्रमाणीकरण आज्ञावली अहवाल जोडला आहे काय ? (होय/नाही) |
|---|---|---|---|
| १ | युनिकोड रुपांतरण. | होय | |
| २ | गोलू निरंक करणे. | होय | |
| ३ | सेवार्थ आयडी रजिस्ट्रेशन (DDE, DBA, मंडल अधिकारी , तलाठी ) करणे . | होय | |
| ४ अ | डाटा दुरूस्ती आज्ञावलीचे २, ५,७,१० ते १४ अहवाल निरंक करणे. | होय | |
| ४ ब | डाटा दुरुस्ती आज्ञावलीचे १,३,६,८,९ अहवाल निरंक करणे. | होय/ नाही | |
| ५ | सर्व प्रलंबीत फेरफार संगणकावर अद्यावत करणे. | होय | |
| ६ | सर्व स.न./ग.न. निहाय पीक नोंदी अद्यावत करणे. | होय | |
| ७ | डिबीए टूलचा वापर करणे. | होय | |
| | सर्व गावांच्या (१००% ) पीडीएफ तयार करणे. | होय | |
| ९ | सर्व प्रिंटेड पीडीएफ हस्तलिखीत अभिलेखा सोबत तपासणी करुन सर्व माहीती अद्यावत करणे. | होय | |
| १० | सर्व तलाठी व मंडल अधिकारी यांचे साठी डिजीटल सिग्नेचर प्राप्त करणे. | होय | |
| **टिप :- अ.न. ४ ब सोडुन सर्व ठिकाणी होय असणे आवश्यक आहे.** | | | |

प्रमाणित करण्यात येते की, वरील अहवालांची आम्ही व्यक्तीश: तपासणी केली आहे. आम्ही असे ही प्रमाणीत करतो की सर्व संगणकीकृत ७/१२ वर दर्शविलेली माहीती ही हस्तलिखीत मुळ रेकॉर्ड प्रमाणे बरोबर आहे. सदर तालुक्यात पुर्व चाचणी (Trial run ) घेण्याची आम्हास परवानगी देण्यात यावी. याकरीता डाटा सीडी सोबत सादर करीत आहोत. सदरचा डेटा स्टेट डेटा सेंटरवर (SDC) वर लोड करुन मिळाल्यास सर्व प्रकारच्या फेरफारांची पुर्व चाचणी घेणेत येईल.

सही :- ---------
नाव :- ----------------डीबीए -------

सही :- ----------
नाव :- -------------- तहसिलदार ----

सही :---------------
नाव :----------------------- जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी

# प्रपत्र-२

## प्रमाणपत्र

७/१२ चा डाटा स्टेट डेटा सेंटरवर अंतीमतः स्थापीत करणेबाबत.

तालका :- जिल्हा :- दिनांक :- --/---/२०१४

एकूण गावे :- एकूण ७/१२ ची संख्या :- एकूण खाते :-

| अं.न. | ऑफलाईन कामाचा तपशिल | समरी अहवालाप्रमाणे काम पुर्ण आहे का ? (होय/नाही) | संबंधीत ऑफलाईन डाटा प्रमाणीकरण आज्ञावली अहवाल जोडला आहे काय ? (होय/नाही) |
|---|---|---|---|
| १ | युनिकोड रुपांतरण. | होय | |
| २ | गोलू निरंक करणे. | होय | |
| ३ | सेवार्थ आयडी रजिस्ट्रेशन (DDE, DBA, मंडल अधिकारी , तलाठी ) करणे . | होय | |
| ४ अ | डाटा दुरुस्ती आज्ञावलीचे २, ५,७,१० ते १४ अहवाल निरंक करणे. | होय | |
| ४ ब | डाटा दुरुस्ती आज्ञावलीचे १,३,६,८,९ अहवाल निरंक करणे. | होय/ नाही | |
| ५ | सर्व प्रलंबीत फेरफार संगणकावर अद्यावत करणे. | होय | |
| ६ | सर्व स.न./ग.न. निहाय पीक नोंदी अद्यावत करणे. | होय | |
| ७ | डिबीए टूलचा वापर करणे. | होय | |
| | सर्व गावांच्या (१००% ) पीडीएफ तयार करणे. | होय | |
| ९ | सर्व प्रिंटेड पीडीएफ हस्तलिखीत अभिलेखा सोबत तपासणी करुन सर्व माहीती अद्यावत करणे. | होय | |
| १० | सर्व तलाठी व मंडल अधिकारी यांचे साठी डिजीटल सिग्नेचर प्राप्त करणे. | होय | |
| टिप :- अ.न. ४ ब सोडुन सर्व ठिकाणी होय असणे आवश्यक आहे. | | | |

प्रमाणित करण्यात येते की, वरील अहवालांची विहीत परिमाणानूसार तपासणी केली आहे. आम्ही असे ही प्रमाणीत करतो की सर्व संगणकीकृत ७/१२ वर दर्शविलेली माहीती ही हस्तलिखीत मुळ रेकॉर्ड प्रमाणे बरोबर आहे. सदर तालुक्यासाठीची ई-फेरफार आज्ञावलीची पुर्व चाचणी (Trial run ) यशस्वीरित्या पुर्ण करुन अदयावत डाटा सीडी सोबत सादर केली आहे. सदरची डाटा सीडी स्टेट डेटा सेंटर (SDC) वर अपलोड करुन ई-फेरफार आज्ञावली -------तालुक्यासाठी ऑनलाईन सुरू करण्याची परवानगी देण्यात यावी. ज्या सर्व्हे नंबर/गट नंबर चे अहवाल क्रमांक १ व ३ यांचा मेळ बसलेला नाही त्या सर्व्हेनंबर / गट नंबरचा मेळ बसत नाही तो पर्यंत ई-फेरफार आज्ञावलीमध्ये फेरफार होणार नाहीत. तसेच तालुक्यात ऑनलाईन फेरफार सुरू होताच हस्तलिखीत फेरफार नोंदवही, ७/१२ व ८ अ नोंदवही बंद करणेत येईल.

सही :- --------- सही :- ----------- सही :- -----------

नाव :- --------------- डीबीए----- नाव :- ------------ तहसिलदार - नाव :---------- --जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी-

सही :- --------- सही :- -------------

नाव :- --------------- डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट------ नाव :- ---------------- जिल्हाधिकारी -----